# 10 फेब्रुवारी

**आजचा सुविचार :**

"अडचणीत असतांना अडचणीपासून दूर पळणे म्हणजे अजून मोठ्या अडचणीत जाण्यासारखेच आहे."

**आजचे पंचांग :**

वार – गुरुवार

मास - माघ

नक्षत्र – रोहिणी

सूर्योदय – सकाळी 7.01 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6.33 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1. 1929 ला जे.आर.डी टाटा हे भारताचे पहिले वैमानिक बनले.
2. 2009 ला आजच्या दिवशी पंडित भीमसेन जोशी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
3. वन अग्नि सुरक्षा साप्ताहाच चौथा दिवस.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Happy – आनंदी

2) Hard - कठीण

3) Head – डोके

4) Hate – द्वेष

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) जेवणापूर्वी आपण हात स्वच्छ का धुतले पाहिजेत?

2) रस्त्याकडेला उघड्यावर मिळणारे पदार्थ आपण का खावू नये?

3) एका चौरसाची एक बाजू 5 मीटर असेल तर त्याचे क्षेत्रफळ किती असेल?

4) बेळगाव जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळांची नावे सांगा.

बोधकथा :

## मनमानी कारभार

एक गाव होतं. त्या गावामध्ये जमीनदार होता , त्याची भरपूर शेती होती. जमीनदार त्या शेतामध्ये अहोरात्र कष्ट करत असे. त्यामुळे उत्पन्न ही चांगले मिळत होते. त्या जमीनदाराला चार मुलं होती , पुढं काही वर्षानंतर ही मुलं मोठी झाली. परंतु या मुलांवर कधीच जबाबदारीची जाणीव झाली नाही. ही चारही मुलं आळशी होती, आपल्या शेतात कधी त्यांनी पायही ठेवला नव्हता. दिवसभर मुलं कोणतंही काम न करता गावातून हिंडत. विलासी जीवन जगणे मौजमजा करणं हा त्यांचा नित्यक्रम होता.

काही वर्षानंतर तो जमीनदार म्हातारा झाला व आजारी पडला. त्यानं आपल्या मुलांना जबाबदारीची जाणीव करून दिली परंतु मुलांमध्ये काहीच फरक पडला नाही. शेवटी त्या जमीनदाराची मरणाची वेळ जवळ आली तेव्हा त्याने आपल्या मुलांना जवळ बोलावून घेतले व सांगितले की, मी आता थोड्या दिवसांचा सोबती आहे, तुम्ही आयुष्यात तीन गोष्टी लक्षात ठेवा तुम्हांला काहाही कमी पडणार नाही.

१) सावलीतून शेतात जा
२) गोड पदार्थ खा
३) गावोगावी घरं बांधा

हे सांगून जमीनदाराने आपले प्राण सोडले. सर्व मुलांनी आपल्या वडीलांनी सांगितलेल्या गोष्टी प्रमाणे वागायचे ठरवले व त्याप्रमाणे सुरवात ही केली. पहिल्या गोष्टी प्रमाणे त्यांनी सावलीतून शेतात कसं जाता येईल याबाबत विचार केला व त्यासाठी घरापासून शेतापर्यंत मांडव घालण्यास सुरवात केली. तेव्हा जमीनदाराचा एक मित्राने येऊन सांगितले की, सावलीतून शेतात जा याचा अर्थ ,सकाळी लवकर उठून सूर्य उगवण्यापूर्वी शेतात जा व दिवसभर शेतात काम करून सूर्य मावळल्यावर घरी या.

त्यानंतर मुलांनी दुसरी गोष्ट आचरणात आणण्याचे ठरवले व त्यासाठी रोजच गोडधोड पदार्थ, पंचपक्वान्न खाण्यास सुरुवात केली परंतु त्याचा त्यांना त्रास होऊ लागला. तेव्हा जमीनदाराच्या मित्राने येऊन सांगितले की, गोड पदार्थ खा याचा अर्थ, ताटामध्ये वाढलेला कोणताही पदार्थ गोड मानून खा.

त्यानंतर मुलांनी तिसरी गोष्ट आचरणात आणण्याचे ठरवले व त्यासाठी गावो गावी घरं बांधण्यास सुरुवात केली. कारण जमीनदारांनं कष्टानं मिळवलेला पैसा खर्च करण्यात मुलांना कोणताचा त्रास नव्हता. तेव्हा जमीनदाराच्या मित्राने येऊन सांगितलं की, गावोगावी घरे बांधा याचा अर्थ, तुम्ही माणसं जोडा. कोणत्याही गावात गेला की तिथं तुमच्या ओळखीचं असावं त्यांनी तुमचं स्वागत आदरातिथ्य करुन तुमची जेवणाची व राहण्याची सोय करतील.

अशाप्रकारे जमीनदाराने सांगितलेल्या तीनही गोष्टीचा अर्थ त्याच्या मुलांना शेवटी समजला.

▪तात्पर्य- कोणत्याही माहितीचा / अर्थाचा अनर्थ लावला तर त्याचा तोटा होतो. मनमानी कारभार केला तर त्याचं नुकसान सर्वांनाच भोगावं लागतं.